| MHPU120002472025 | नियमित दिवाणी दावा क्र.३२/२०२५ मधील निशाणी क्रमांक ४६ वरील आदेश<br>**( गजानन शेटे व इतर ७ विरुध्द भोर नगरपालिका तर्फे मुख्याधिकारी)** |
|---|---|

प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा कैफियत देण्याकरीता झालेला विलंब माफ करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे दाव्यातील काही महत्वाची कागदपत्रे ही अत्यंत जुनी असल्यामुळे सदर कागदपत्रे काढण्यास प्रतिवादी यांना वेळ लागल्यामुळे विहित मुदतीत त्यांना कैफियत दाखल करता आली नाही. तसेच विलंब हा हेतुपुरस्सर झालेला नसून काही तांत्रीक अडचणीमुळे झालेला आहे. सबब, सदचा विलंब हा माफ होणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०३.** वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी त्यांचे म्हणणे प्रस्तुत अर्जास दाखल केलेले नाही. परंतु त्यांनी युक्तिवादादरम्यान अर्जातील मजकूर नाकारलेला आहे.

**०४.** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र.१ यांनी विहित मुदतीत दाव्यास त्यांची कैफियत दाखल केली नसल्याची बाब सकृतदर्शनी दिसून येते. दिवाणी प्रक्रिया संहितामधील तरतूदीनुसार प्रतिवादी यांनी ३० दिवसात त्यांची कैफियत दाखल करणे अनिवार्य आहे. परंतु त्यानंतर न्यायालयाने मुदत वाढविल्यास पुढील ६० दिवसापर्यंत म्हणजेच एकूण ९० दिवसात प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करणे अपेक्षित आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणात विहित मुदतीत प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत दाखल केलेली नाही. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द ठराव व मनाईकरीता दाखल केला आहे. सदर दाव्याचे स्वरुप पाहता दावा गुणदोषावर निकाली होणेकरीता प्रतिवादी यांची कैफियत आवश्यक आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश

पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१. प्रतिवादी क्र.१ यांना दाव्यास कैफियत दाखल करण्याकरीता झालेला विलंब माफ करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2025.08.20 17:58:53 +0530

**ठिकाण – भोर** **( एस.डी.शिरसाट )**

**दिनांक – २०.०८.२०२५.** **०२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भोर .**